
# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष : २ । अंक : ३ । डिसेंबर २०१९ (मासिक) । मूल्य ₹ १००। AED 10 | US$ 2 www.panthastha.com



**It's time for the same old boring activity of Auditing of Annual Financial Statements**

# Genuineness Simplified ®

## Presenting

- Better reports with graphical representation and tabular data
- Audit reports acceptable in all banks and free zones of UAE
- Faster and more economical audits with online data sharing
- Largest team of qualified chartered accountants in its class

## From

Prudential Auditing
Chartered Accountants
المدقق المتدبر
محاسبون قانونيون

PO Box 5201, #46, Fujairah Building,
Faseel, Nakheel Street, Fujairah, UAE
+971-9-224 2613
www.prudentialauditing.com

95/3, Street 19, Opposite CEAT Tyres,
M I D C, Satpur, Nashik, India – 422 007
+91-253-235 4657
info@prudentialauditing.com

VERICO AUDITING

PO Box 32556, Office 302, Al Ameri Tower,
Barsha Heights / TECOM, Dubai South, UAE
+971-4-360 6256
www.vericoauditing.com

303, New Udyog Mandir, 7C Pitambar Lane,
Mahim West, Mumbai, India – 400 016
+91-22-5664 4233
info@vericoauditing.com

## Special Offers

**Special offers for 2019:**
- **Historical Accounting at AED 1 per voucher or AED 300 per year**
- **Auditing of Tiny business from AED 1,200 ownwards**

**Special offers for 2020:**
- **Online Realtime Accounting at AED 2 per entry / AED 50 per month**
- **One time additional fee of USD 200 for system generated invoices**

(Try our unique fee calculator at https://www.prudentialauditing.com/calc/auda.php
to know our special offers and select No Frills Discount)

| STATUTORY | INTERMEDIATE | THIRD PARTY | INTERNAL | MISCELLANEOUS |
|---|---|---|---|---|
| **Annual Audit** | **Supply Chain Audit** | **Project Feasibility** | **Book Keeping** | Document Storage |
| Quarterly Audit | **Business Projection** | **Business Valuation** | **Administration** | Asset Management |
| Monthly Audit | Project Set-up | **Company Formation** | **System Set-up** | Environment Protection |
| Compliance Review | Project Management | Company Liquidation | Systems Audit | **Energy Audits** |
| Direct Tax Advice | **Insurance Management** | **Due Diligence** | Business Management | Revenue Audit – Malls |
| **Indirect Tax** | **Surrogate Managers** | Risk Analysis | Management Audit | Continue / Exit Analysis |
| **Company Law** | Tax Residency | Actuarial Assessment | IFRS Implementation | Buy or Hire Analysis |
| Legal Accounts Opinion | Performance Review | Contracts Drafting | Training | Make or Buy Analysis |
| **Certification** | Performance Improvement | **Reconciliation** | Recruitment Assistance | Database Building |
| Court Reports | **Bank Accounts** | Arbitration | **Forensic Audits** | **Market Research** |
| Audit of Brokers | **Succession Planning** | Settlement | **Wellness** | Personnel Policy |

## Team


CA Aman Talwar
+971-55-556 6334


CA Mihir Mathuria
+971-50-484 4657


CA Dhawal G Nandedkar
+971-55-222 4657


CA Karan Nandwani
+971-52-691 0995


CA Nandkishor Sahu
+971-50-848 3440


Prasannah Baskaranathan
+971-55-991 3324


Shadab Ahmed
+971-52-803 0993


Neelam Nandedkar
+971-55-987 4657


Juned Ahemad
+971-55-822 5264


Yashashree Dixit
+91-94048 06892

# अनुक्रमणिका


- संपादकीय – डॉ. संदीप कडवे ......... ०४
- बॅगपॅकर पांथस्थ – प्रविण मानकर ........................... ०६
- शेतकरी फाशीशी, उद्योगपती तुपाशी– सतिश देशमुख......... ०८
- मराठी गझल – रमेश आराख .......... १०
- ग्लोबल मायग्रेशन रिपोर्ट –IMO .......................... ११
- कृषी माल प्रक्रिया उद्योग – संजय सोनवणी ................. १२
- स्टार्टअप संस्कृती – येरेयेरे पैसा –डॉ–संदीप कडवे .......... १४



विश्व पांथस्थ
अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

विश्व पांथस्थ
वर्ष २ अंक ३
डिसेंबर २०१९

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

वितरण साहाय्य
राजन ताबडे, अबू धाबी
गजानन खोलगडे, बहरीन
धवल नांदेडकर, फुजेरा
वीरभद्र कारेगावकर, अजमान

मुखपृष्ठ आणि सजावट
सौ.मानसी कुलकर्णी,(मानसी आर्टस्) पुणे

मूल्य ₹ 100 | AED 10| US$2

Vishwa Panthastha
Year 2 Issue 3
December 2019

First Marathi Monthly For NRI Maharashtrian

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Distribution Support
Rajan Tawde, Abu Dhabi
Gajanan Kholgade, Bahrain
Dhawal Nandedkar, Fujerah
Veerbhadra Karegaonkar, Ajman

Cover & Design
Manasi Kulkarni (Manasi Arts) Pune

Price : ₹ 100 AED 10 US$ 2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए–७०३, निसर्ग सिटी–२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११०५७ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक – संदीप वसंतराव कडवे**
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune -411057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



**या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

# संपादकीय



मार्च २०१९ पासून नोव्हेंबर १९ हा कालावधी प्रचंड बदलाचा ठरला. १०% जीडीपी वाढीचा अंदाज खोटा ठरवत आत्ता ५% जीडीपी देखिल शक्य होईल की नाही असा संभ्रम निर्माण झाला आहे. कृषी क्षेत्राची ०.०१% इतकी मामुली वाढ सोडली तर सेवा उत्पादन सर्वत क्षेत्रात पिछेहाट झाली आहे. मात्र सरकारी खर्चात ११% इतकी भरीव वाढ झाली आहे. मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया घोषणा हवेत विरल्या आहेत. अर्थातच बेरोजगारी वाढली आहे व नजिकच्या भविष्यकाळात अर्थव्यवस्था पटकन रुळावर येईल अशी चिन्हे दिसत नाही.

आश्चर्य म्हणजे या नकारात्मक वास्तविकता व अधोगतीला मतदारांनी नाकारुन पुन्हा भाजप सरकारला केंद्रात निवडुन आणले. यात आरोप प्रत्यारोप खुप झाले व त्यात तथ्यही असावे. परंतु न्यायदरबारी याला काहीच किंमत दिली गेली नाही. मग महाराष्ट्राची विधानसाठी निवडणुक झाली व व संभ्रमित मतदारांनी संभ्रमित दानकौल दिला. अनेक प्रस्थापित विचारधारांनी बाजुला सारत महाविका आघाडीचे संयुक्त सरकार शिवसेनेच्या नेतृत्वात स्थापन झाले. एका अर्थाने ही राजकारणातील क्रांती असेच म्हणावे लागेल. एक मात्र सिद्ध झाले दिवस क्रांतीचे आहेत. उत्क्रांतीचे नाहीत.

उद्योग, व्यवसाय, धंदा यातही हाच नियम लागू होताना दिसतो आहे. त्यालाच disruptive innovation असे म्हणतात. उत्क्रांती अर्थात incremental progress आता मागे पडत चालली आहे.

स्टार्टअप इंडस्ट्री याच disruptive innovation या तत्वानुसार वेगाने बदलते आहे व बदल घडवत आहे. दुर्दैवाने जेवढा वेळ व जितकी प्रसिद्धी राजकारण व राजकारण्यांना प्रसिद्धी माध्यमांनी दिली आहे, त्याच्या एका दशांश देखिल प्रसिद्धी या नवनिर्माण करणाऱ्या उद्योजकांना मिळली नाही. जीएसटी, नोटबंदी, US-China Trade War, वगैरे अनेक वार झेलून देखिल नवयुवक काही घडवण्याच्या मागे आहेत. त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. एक अनिवासी भारतीय म्हणून तुमचा यात किती प्रत्यक्ष व थेट सहभाग आहे हा प्रश्न तुम्हीच स्वत:ला विचारला पाहिजे व त्यावर विश्व पांथस्थ च्या माध्यमातून उत्तर शोधण्याचे जे प्रयत्न चालु आहेत त्यात सामिल झाले पाहिजे. म्हणजे काय केले पाहिजे?

१) अनिवासी भारतीय असल्याने तुम्ही चाकोरी सोडुन विचार करु शकता, जोखिम घेऊ शकता, वेगळ्या देशात वेगळ्या लोकांबरोबर काम करून स्वकर्तृत्वावर कमाई करू शकता. हे तर सिद्ध झालेय आहे व ते अभिनंदनीय आहे. परंतु परदेशात आले म्हणजे कुठलीही किंमत मोजून परदेशातच राहिले पाहिजे असे नाही. जर नोकरी गेली असेल, व्यवसाय व्यवस्थित चालु नसेल व एकंदरीतच आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असेल तर ज्या कारणाकरता परदेशात आलात ते साध्य होतच नाही. अशा परिस्थितीत भारतात परत येण्याला काहीच हरकत नाही. एक पाऊल मागे आल्याने प्रगती थांबत नाही. माझ्या माहितीतील एक व्यक्ती नोकरी गेली, व्हीसा संपला, आर्थिक तोटा झाला तरी अनाकलनीय कारणांकरीता दुबईला राहते आहे. आपण स्वत: हा अविचार टाळला पाहिजेच परंतु आपल्या आसपास कोणी या परिस्थितीत असेल तर त्यांचे समुमपेदशन करून त्यांना सुस्थितीत येण्यास किंवा भारतात परतण्यासाठी उद्युक्त केले पाहिजे.

२) उद्यमशिलता अंगिकारुन भारतात वा परदेशता स्वत:च्या छोटामोठा व्यवसाय उभारला पाहिजे अथवा अशा उद्योजकाला मदत करून त्याच्या व्यवसायात/धंद्यात/ उद्योगात भागीदार व्हायला हवे.

३) सामाजिक प्रकल्पांमध्ये, शक्यतो भारतातच, सामील झाले पाहिजे. फक्त आर्थिक नाही तर वेळ व श्रम देऊनही यात सामील व्हावे

४) राजकारण हा गौसिपचा भाग नाही. आणि सोशल मिडीयावर वाद घालत बसण्यापेक्षा खरोखर काही चांगल्या राजकारणी वा समाजकारण्यांबरोबर काम केले पाहिजे. वाईट अनुभव आला तर आपोआपच नाद सुटेल. चांगला अनुभव आता तर एखाद्या चांगल्या प्रकल्पांत सामील होता येईल.

५) परदेशांत असतांना परदेशी लोकांशी ओळखी ठेवणे, त्यांच्याबरोबर नविन काही शिकणे हे फार महत्वाचे आहे. स्वत:भोवती आपल्याच कुवतीच्या किंवा जाती समाजाच्या लोकांचे कोंडाळे करून जगलात तर परदेशात राहणे व पुणे, डोंबिवली, नागपुर, सांगली, सातारा, औरंगाबाद येथे राहणे यात काही फरक नाही. कंफर्ट झोनच्या बाहेर जगण्याचा प्रयत्न करा.

Innovation ही एक प्रवृत्ती आहे. त्यासाठी सतत चिकित्सक वृत्ती बाळगावी लागेल. आसपासच्या गोष्टी, लोकांचे प्रॉब्लेम्स यांच्या अंदाज बांधवा लागतो. त्यावर उपाय शोधावा लागतो. त्याच उपायाचे मार्केटमध्ये टेस्टींग करावे लागते, त्याला Proof of concept म्हणतात. ते सफल झाले तर त्याचे योग्य ते प्रॉडक्ट बनवून व्यावसायिक रित्या मार्कटमध्ये उतरवुन बिझनेस उभा करावा लागतो. सुरवातीला हा सगळा खटाओप स्वत:च्या पैशाने करावा लागतो. नंतर Angle investment, venture capital वगैरे फंडींग मिळते. हे Innovation जर disruptive असेल तर निश्चितच प्रचंड आर्थिक फायदा होऊ शकतो. यात एखाद्या मेंटर (Mentor) ची मदत अवश्य घ्यावी.

निर्मितीचा ध्यास, नव्याची आस हा पांथस्थचाय एक गुणधर्म आहे.

केल्याने देशाटन, पंडीत मैत्री
सभेत संचार, मनुजा चातुर्य येतसे फार

असे रामदासानी म्हटले आहेच. विश्व पांथस्थ च्या सर्व वाचकांना ज्ञानी, धनी व आनंदी होण्यासाठी शुभेच्छा!

येणारे वर्ष २०२० आपणा सर्वांना आनंदाचे व भरभराटीचे जावे हीच सदीच्छा!

- डॉ. संदीप कडवे

# बॅगपॅकर पांथस्थ प्रविण मानकर यांची दिलखुलास मुलाखत




**आपले मूळ गाव कोणते व परदेशात कधी व कशा कारणाने जाणे झाले ?**

मी मुळचा नासिकचा . येथेच जन्म आणि येथेच शिक्षण. मी कॉस्ट अकौंटंट आहे. नासिकला पहिली अठरा वर्षे मोठ्या कंपन्यांमध्ये नौकरी केली (Ceat आणि Crompton Greaves). हळूहळू पदोन्नती होऊन लवकरच सिनिअर व्यावसायिक झालो. सगळं कसं छान चाललं होतं. विदेशात जाण्याचा कधी मनात विचार सुद्धा केला नव्हता . १९९९मध्ये आमच्या शेजारी एक वृद्ध मुस्लीम कुटुंब राहण्यास आले. ते भारतात ३५ वर्षानंतर परतत होते , युगांडा आफ्रिकेतून. त्यांनी माझा ब्रेन वाश केला. बेटा इधर क्या कर रहे हो , विदेश जाओ और जादा पैसा बनवो . मी आधी दुर्लक्ष केले पण ६ महिन्यानंतर जाहिराती बघायला सुरवात केली . अमेरिकत जास्त रस नव्हता . तिसरा अप्लिकेशन विजयी ठरला आणि मी प्राणी बघण्यासाठी पूर्व आफ्रिका ( युगांडा ) निवडली. ४/५ लाख रुपये ( २/३ वर्षात ) कमावून परत येऊ असा मानस होता .

**परदेशातील किती वर्षे वास्त्यव्य व आपला अनुभव कसा होता ?**

परदेशात मी १८ वर्षे राहिलो. पूर्व आफ्रिका ( युगांडा केनिया टांझानिया ) येथे १२ वर्षे तर सौदी अराबिया येथे ६ वर्षे. एक वाक्यात सांगायचे तर समृद्ध करणारा अनुभव होता तो. मंतरलेले दिवस होते ते.. मला जर कोणी विचारलं कि रिटायर्ड झाल्यावर कोठे राहायला आवडेल – तर मी सांगतो – कम्पाला , युगांडा येथे. अजूनही वेर्जीन' आयुष्य जगतात ती लोकं .असो, परदेशात राहून परदेशाबद्दल नाकं मुरडण्यात काय अर्थ . अधिक अर्थ' प्राप्त झाल्यावर कोणताही देश अर्थपूर्ण वाटायला लागतो. तेथील खडतरपणा बोथट होत जातो.

मला मजा आली . वेगवेगळ्या लोकांबरोबर काम करावयास मिळाले. नेतृत्व किती प्रकारचे असते हे समजले. भारतापेक्षा बाहेर गोष्टी किती वेगळ्या असतात हे उमजले. मुख्य म्हणजे छोट्याशा कुंडात पोहण्याऐवजी समुद्रात पोहण्याचा अनुभव मिळाला.

**भारत सोडल्याने विचारशैलीत, आचार व आकलनात खूप फरक पडला असे वाटते का? त्या अनुषंगाने, पुन्हा भारतातील तुमच्या मित्रांत व तुमच्यात हा फरक जाणवतो का ?**

भारत सोडल्याने विचारशैलीत, आचार व आकलनात खूप फरक पडला असं नक्कीच वाटतं. माझ्यात अमुलाग्र बदल झाला. विचारांची व्याप्ती वाढली. कदाचित खोलपणा वाढला. जबाबदार्या बहुदा वाढल्याने होत असेल. भारतात काम करतांना तोच तोच पणा येतो. ( 'तेच तेच राज का' रण , नकोसं होतं ). विदेशात नक्कीच नवीन परिस्तितीशी जुळवून घेतांना जास्त विचार करावा लागतो.

आचार नक्कीच बदलले. याचं मुख्य कारण म्हणजे वेगवेगळ्या लोकांशी संपर्क. आपल्याला बदलावे लागतेच.

माणसाची आकलनशक्ती हि परिस्थीतीशी निगडीत असते. ती बदलली कि आकलन वाढत जाते. कारण जिवंत राहायचं असतं म्हणून. मला वाटतं कि हि प्रक्रिया अपोआप होत जाते.

भारतातील मित्र भेटले आणि त्यांच्याशी गप्पागोष्टी केल्या कि जाणवतं . कि अंतर जाणवतं. त्यांचे विषय आणि विचार संकुचित वाटतात. आपणास जास्त अनुभव आणि अनुभूती आहे याची जाणीव होते. आपली कार्यशैली आणि विचारांचा घाट' खूप बदलेला आहे असं नक्की जाणवतं.

**भारतात परत येण्याचे का ठरवले ?**

मी सर्व सोडून दोनदा भारतात आलो आहे.

पहिल्यांदा २०१० मध्ये. पुरे झालं आत्ता हे सर्व , आत्ता थोडी समाजसेवा करू आणि मुलाचं लग्नही करू असा विचार करून युगांडा येथून मी परत आलो. मुलाचं लग्न झालं. पण समाज सेवेकरिता वाव मिळत नव्हता. विद्यमान समाजसेवक दुसऱ्यांना लवकर सामाऊन घेत नाही असं वाटलं. दीड वर्षे वाट बघितली. अगदीच्या साठी निवड झाली होती. पण मनासारखं काही झालं नाही. मग सौदीत गेलो

दुसऱ्यांदा २०१७ मध्ये परत आलो. दुग्ध शर्करा योग आला होता. माझ्या कंपनीची अवस्था बिघडत चालली होती आणि मलाही कंटाळा आला होता. मुख्य म्हणजे मला जग फिरायचं होतं. मग ठरवलं. दिलं सोडून सर्व, आणि परत आलो.

**तुम्ही जवळ जवळ संपूर्ण जगाची परिक्रमा केली आहे. त्यामागचा उद्देश काय ? प्रेरणा कशी मिळाली ?**

हो आत्तापर्यंत ६६ देश फिरून झालेत. अगदी तुडवले' असं म्हणा . मी backpaking करतो. उद्धेश' वैगरे असं काही नाही. जग सुंदर आहे (भारत आणि परदेश ) हि जाणीव मला वयाच्या ३०व्या वर्षी झाली . मी किंचित रसिक' आहे . संगीत आवडतं. थोडासा चित्रकार आहे ( जे जे स्कूलमध्ये आजीने पाठवले नाही ?!). चित्रकाराची भूक मी छायाचित्रण' करून भागवतो . सिनेमा भयंकर आवडतो ( world सिनेमा ). म्हणून जे जे सुंदर आहे जगात ते ते , जेव्हढे शक्य होईल तेव्हढे बघावे असा मानस. सुदैवाने विदेशात नौकरी केल्याने पैशाची चिंता नसते.

मला कोणाकडूनही प्रेरणा मिळालेली नाही. मी स्वयंप्रेरित असावा बहुदा. सुंदर आयुष्य जगायचे असेल तर घराबाहेर पडलेच पाहिजे असा विचार. जगातील भिन्नता मला मोहावते. जगातील मनुष्यप्राणी आणि निसर्ग हा खूप वेगळा वेगळा आहे , तो बघायला मला आवडतं. जगातील लोक चांगले आहेत याच्यावर माझा दृढविश्वास आहे. म्हणून तर मी बिनधास्तपणे फिरत असतो. मला परदेशात मरण आले तर काय ? अशी भीती कधीच वाटत नाही.

**किती देशांना भेटी दिल्यात व त्यातील निवडक अनुभव कृपया सांगा.**

आत्तापर्यंत मी ६६ देश बघितले . माझ्याकरिता स्कॉटलंड इंग्लंड आणि आयर्लंड हे तीन देश आहे कारण त्यांचा स्वभाव' भिन्न आहे. निवडक अनुभव ? कित्तीतरी ... एकेका ओळीत सांगतो. तुम्ही मला गप्पागोष्टी करायला बोलावा मग ३ तास अनुभव कथन करिता येईल . पण तरी येथे काही नमूद करतो. खालील अनुभव माझ्या बरोबर शेवट पर्यंत राहतील हे नक्की .

रशिया येथे – रशिअन Ballet- Swan lake St. Petersburg

डेन्मार्क येथे – शेक्स्पेअर यांनी हम्लेट ज्या क्रोन्बोर्ग किल्ल्यामध्ये लिहिले तेथे हम्लेट नाटक बघणं

जर्मनी येथे – बर्लिन वाल बघणं

जर्मनी , पोलंड , ऑस्ट्रिया – येथे हिटलरचे कॅम्प बघणं आणि तेथे श्वास घेणं

जपान येथे – हिरोशिमा ला भेट

सौदी अराबिया येथे – मदिना मशिदीला भेट

साउथ कोरिया येथे – पाचव्या शतकातील घरं बघणं

नॉर्वे येथे – चार चाकीतील मुक्त संचार

अमेरिका येथे – १३ दिसत ११ नॅशनल पार्क ची भ्रमंती

कॅनडा येथे – कुबेक प्रांत बघणं

चीन मध्ये – चायनीज गार्डनमध्ये फिरणं

न्यूझीलंड येथे – milford sound अनुभवणं वैगरे वगरे

**प्रवासाने अनुभवविश्व समृद्ध होते. वाचकांसाठी तुम्ही काय संदेश द्याल ?**

तरुण असतांना स्वतः साठी वेळ द्या. भटकण्याची सवय करा. जाण्या अगोदर भरपूर रिसर्च करा. Backpacking पद्धत अनुभवा म्हणजे खर्च कमी व अनुभव जास्त येईल

**या अनुभवाचा पुढील आयुष्यात काय उपयोग करण्याची इच्छा आहे ?**

मी सध्या समाज प्रबोधन करतो आहे. छोटे छोटे कार्यक्रम करत आहे. कदाचित पुस्तक लिहीन. लोकानी माझ्यासारखं जग बघावं अशी इच्छा आहे . तुमच्या गावात सुद्धा एखादा कार्यक्रम करता येईल. माझा profile पाठवत आहे.

**तुमच्या सहकार्याबद्दल खूप धन्यवाद.**

**प्रवीण मानकर**




# शेतकरी फाशीशी, उद्योगपती तुपाशी

**–सतिश देशमुख**

आर्थिक मंदीच्या संभाव्य संकटाबद्दल मी सहा महिन्यांपूर्वीच संकेत दिले होते व असे लिहिले होते की जोपर्यंत ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकर्यांच्या खिशात पैसा खेळत नाही, त्यांची क्रयशक्ती वाढत नाही तोपर्यंत ही खोटया विकासाची सुज कमी होणार नाही. आर्थिक मंदीचे मुळ हे सरकारच्या कृषीद्रोही धोरणात आहे. त्यांनी औद्योगिक व सेवा क्षेत्राला डोक्यावर घेऊन ग्रामीण व कृषी क्षेत्राला सावत्रपणाची वागणूक दिली आहे. शेतकरी आणि भांडवलदार उद्योगपतींच्या व्यवसायामध्ये साम्य आहे. कारण दोघेही उत्पादक व उद्योजक आहेत. दोघेही कामगार / शेतमजुरांना रोजगार देतात. दोघानाही वीज, पाणी, निविष्ठा, इनपुट्स लागतात. भारताच्या आर्थिक प्रगती (जी.डी.पी.) मध्ये कृषि व औद्योगिक क्षेत्राचा वाटा आहे. परंतु शेतकऱ्यांना सर्व बाजुंनी जखडुन टाकून त्यांच्यावर अन्याय झाला आहे हे खालील तपशीला वरून लक्षात येते.

१) शेतकऱ्यांची उत्पादकता गुणाकाराची व प्रचंड आहे. तो एका दाण्याचे हजार दाणे करतो. तो सृजनशील आहे. उद्योगपतीचे उत्पादन वजाबाकीचे आहे. १००० किलो लोखंड ओतल्यावर फॅक्टरीतुन अंदाजे ६५० किलो वजनाचा माल तयार होतो.

२) शेतकऱ्याला वीज रात्री मिळते. सहा तास. उद्योगपतींना २४ तास वीज मिळते.

३) शेतकऱ्यांना उत्पादित माल कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या आवारातच विकायचे बंधन आहे. (APMC कायदा). उद्योगपतींना माल कोठेही विकायचे स्वातंत्र्य आहे.

४) कच्च्या शेतमालाला निर्यात बंदी आहे. घटनेतील मुलभूत अधिकाराचे 'व्यापार स्वातंत्र्य' हिरावुन घेतले आहे. (आवश्यक वस्तु कायदा). उद्योगपती जगात कुठल्याही देशात निर्यात करू शकतात. त्यांना जागतिकीकरण व मुक्त अर्थ व्यवस्थेचा फायदा झाला.

५) शेतमालाचे भाव ठरवताना (Minimum Support Price) न्युनतम आधार मुल्य जाहीर करतात जे उत्पादन खर्चापेक्षा कमी असतात. मालाची विक्री त्यापेक्षाही कमी भावाने होते. उद्योगपती भाव जाहीर करताना (MRP) Maximum (कमाल) Retail Price छापतात.

६) शेतकऱ्याला जमीन किती बाळगायची त्याला मर्यादा आहे. (उदा. कोरडवाहू ५४ एकर, बागायती १८ एकर) (कमाल शेतजमीन धारण कायदा).उद्योगपती हजारो एकर जमीनीचे

मालक आहेत. (उदाहरणात सुब्रोतो रॉय (सहारा ग्रुप) कडे ३३,६३३ एकर जमीन आहे).

७) शेतकऱ्याच्या दोन साखर कारखान्यामध्ये २५ कि.मी. हवाई अंतर असले पाहिजे असे बंधन आहे. (सहकार कायदा). इंडस्ट्रियल एरीयामध्ये सर्व कारखाने चिटकुन असतात.

८) केळकर अहवालाच्या शिफारशीनुसार पाण्याच्या वाटपाचा क्रम पिण्याचे पाणी, कृषीसिंचन व नंतर औद्योगिक वापर आहे. पण हे सुत्र पाळत नाहीत. औद्योगिक क्षेत्राला प्रथम प्राधान्य व अमर्याद पाणी पुरवठा करतात.

९) कर्ज किंवा वीज बील थकले तर जप्तीची नोटीस येऊन नामुष्कीची वेळ येते. गाव सोडुन पण जाता येत नाही. कर्जबुडव्या उद्योगपतींना विमानाने परदेशात पाठवतात.

१०) बैल जोडी म्हातारी झाली किंवा जखमी झाली तर विकून नवीन ताज्या दमाची घेता येत नाही. भाकड जनावरे मरे पर्यंत सांभाळावी लागतात. कारण गोवंश हत्या बंदी कायदा. तर कारखान्यात जुन्या झालेल्या, गुणवत्ता न देणाऱ्या मशीनरीची योग्य विल्हेवाट लावुन नवीन अत्याधुनिक मशीनरी खरेदी करता येतात.

११) 'शेतकरी अन्नदाता' आहे. उदात्त (Noble) हेतु. उद्योगपती 'नफेखोर' आहे. नफा कमविणे' हाच मुळ उद्देश.

१२) 'खरेदी केंद्र सुरू करा', दुष्काळ जाहीर करा' चारा छावणी चालु करा', थकलेले चुकारे द्या' विम्याचा भ्रष्टाचार', ठिबक, ट्रॅक्टर अनुदानातील घोटाळे', पाणी सोडा' वगैरे मागण्यासाठी शेतकऱ्यांना सारखे आंदोलन, उपोषण, जिल्हाधिकार्याकडे निवेदन, रास्ता रोको असे अन्यायाविरूध्द झगडावे लागते. उद्योगपतींचा सर्व वेळ उत्पादकता (Productivity) वाढीसाठी वापरला जातो.

१३) न्याय मागण्यासाठी संघर्ष करणार्या जागृत कार्यकर्त्यांवर लाठी हल्ला, गोळीबार, पोलीस केसेस चालु असतात. उद्योगपतीला सामाजिक प्रतिष्ठा असते.

१४) शेतकरी कर्ज काढुन मुलीचे लग्न करतो, कर्जासाठी बँकेच्या हेलपाटया मारतो. उद्योगपती मुलीच्या लग्नामध्ये ८०० कोटी रूपये खर्च करतो उद्योगपतींसाठी ५९ मिनिटात कर्ज वाटप योजना आहे.

१५) मुळ घटनेत प्रदान केल्याप्रमाणे, दुरूस्ती नंतर जमीनीच्या मालमत्तेचा मुलभूत अधिकार नाही. कधीही सातबार्यावर शिक्का मारतात व जबरदस्तीने जमीन हिसकावुन घेतात. (उदारहणात नागपूर मुंबई विनाश' महामार्ग) (भूमी अधिग्रहण कायदा). उद्योगपतींच्या जमीनीला कोणी हात लावु शकत नाहीत. उलट हेच दुसर्यांच्या गिळंगृत करतात. (उदा. टाटा मोटार्स ने सिंगुर येथील ९९% एकर जमीन बळकावली होती).

१६) शेतकऱ्यांचे रडत खडत फक्त  हजार कोटी रू. माफ केले. त्यात किष्ट अटी, शर्ती, निकष, वेळ खाऊपणा (२.८ वर्षे) लावला. उपकाराची भावना. उद्योगपतींची कर्ज माफी सरकारने अर्ज न मागवता सरसकट केली. तब्बल ३,०३,३९४ कोटी रूपये, २०१५-१८ हया काळामध्ये. त्याला Write Off असे गोंडस अर्थशास्त्रीय नाव दिले.

१७) अप्रत्यक्ष अनुदान देतात. ते ही उद्योगपतींच्या खते, ट्रॅक्टर, ठिबक, पॉली हाऊस बनवणार्यांच्या घशात जाते. सबसीडी' (बोजा) असा नकारात्मक शब्दप्रयोग करतात. तर चार वर्षात कॉर्पोरेट हाऊसेस, गर्भ श्रीमंताना अंदाजे २२ लाख कोटी रू. ची टॅक्स मध्ये सवलत दिली आहे. (केंद्रीय बेजट नुसार (२०१४-१%) मध्ये १६.५ लाख कोटी रू.). टॅक्स इंसेन्टीव्ह दिला तो वेगळा. प्रोत्साहन' म्हणजे सकारात्मक शब्द वापरतात.

१८) बाजारपेठेतील सरकारच्या हस्तक्षेपामुळे, आयातीमुळे शेतमालाचे भाव कोसळतात. त्यामुळे आपल्या उत्पादनाचे भाव शेतकरी ठरवु शकत नाही. (तत्वत: ठरवु शकतो पण ते निरर्थक आहे). उद्योगपती काडेपेटी पासून ते विमानापर्यंत उत्पादनाचा विक्रीचा भाव ठरवु शकतो.

१९) शेतकऱ्यांना ३०% मिळाले (आठ महिने कालावधी) तर मध्यस्थी दलाल व्यापारी हयांना ७०% नफा (एका महिन्यात) मिळतो. मोजक्या व्यापार्यांचे संगनमताचे रॅकेट (साखळी) करून एकाधिकाराने भाव ठरविण्याचे कारस्थान संपुष्टात आणणारा, हे सुत्र बदलण्यासाठी शेतकरी उपयोगी' नवीन कायदा हवा. तर उद्योगपतीना ८०% मिळत असतील तर रिटेलर, डीलरस् वगैरे साखळीतील लोकांना २०% मिळतात.

२०) शेतीला व्यवसायाचा दर्जा नाही. जो तोटयात आहे. शेतकरी आत्महत्या करतो. उद्योगपती नफ्यात लोळतोय. स्टेक होल्डरसना डिव्हीडंड, बोनस वाटतो.

२१) धंदा तोटयाचा आहे हयाची खात्री असुन शेतकरी श्रम व पैश्याची गुंतवणूक करतो. जास्त जोखीम. उद्योगपती कॅलक्युलेटेड रिस्क घेतो. कमी जोखीम.

२२) अन्न कृषी प्रक्रिया उद्योगाचा विकास पूर्णत: सहकारी चळवळीवर विसंबुन राहीला त्यामुळे मोठया प्रमाणात गुंतवणूक नाही. फक्त लघुतम उद्योग निर्मीती (लोणंचे, पापड, कुकूटपालन, सुत गिरण्या वगैरे). ग्रामीण रोजगार निर्मीती नाही. शेतमालाचे मुल्यवर्धन (Valuaddition) नाही. Rural Economic Zone निर्मीती नाही. ह्याउलट स्वातंत्र्यानंतर अवजड उद्योगामध्ये सरकारी (Public Sector) गुंतवणूक करून औद्योगिक क्रांती झाली. आय.टी. हब, मेगा औद्योगिक क्षेत्र निर्मीती झाली. एस.ई. झेड. द्वारा सवलती.

२३) शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे स्वातंत्र्य नाही. बी.टी.बियाणे, जी.एम. तंत्रज्ञान बंदी तसेच त्यांच्या चाचणीला स्थगिती दिली हे अन्यायकारक आहे. त्यामुळे सर्व विद्यापीठातील स्वदेशी संशोधन पण ठप्प आहे.उद्योगपतींना आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास, आयात करण्यास (Technical Collaboration) मुभा आहे. आय.टी. क्षेत्रात तर एका वर्षात जुने तंत्रज्ञान कालबाहय होते.

२४) अन्न सुरक्षा कायदयामुळे शेतकऱ्यांना मजुर मिळणे अवघड झाले आहे. ग्रामीण भागातील लोकांना देशोधडीला लावल्यामुळे उद्योगपतींना शहरात कामगार कमी पगारात, तेही कंत्राट धरतीवर सहज उपलब्ध आहेत.

२५) निवडणूकीच्या काळात विविध योजने अंतर्गत सरकार शेतकऱ्यांना आर्थिक मदत (आधुनिक निवडणूक लाच) देते. तर निवडणूकीच्या काळात उद्योगपती ५ वर्षात लुटलेल्या पैश्याचा काही भाग सत्ताधार्यांच्या पक्षात जमा करतात.

वरील तुलनात्मक तपशीलाद्वारे मी माझ्या मागण्या अप्रत्यक्षरित्या मांडल्या आहेत. त्या परत विस्ताराने देण्याची येथे आवश्यकता नाही. कारण हया प्रत्येक प्रश्नांवर विश्लेषण करणारे माझे स्वतंत्र लेख आहेतच.

*****

## मराठी गज़ल

कुंपणाची चोरट्यांशी आज यारी वाटते
ही नव्या घनघोर युद्धाची तयारी वाटते

तो कवितेच्या वहीची दोन पाने झाकतो
नोंदली त्याने किराण्याची उधारी वाटते

बंद करुनी दार , दाणे फेकते खिडकीतुनी
पाखरांना शहर हे आता शिकारी वाटते

आजवर नुसतेच काटे पेरले वाटेवरी
त्यामुळे तर उगवली बाभूळ दारी वाटते

काळजावर मी तिची हसरी प्रतीमा कोरतो...
अन तिला स्वप्नातही माझी शिसारी वाटते

का अचानक दोर फांदीहून त्यांने सोडला
पाहिली बहुतेक चिमण्यांची भरारी वाटते

– रमेश आराख, बुलडाणा

# ग्लोबल माइग्रेशन रिपोर्ट 2020 जारी, दुनिया में २७ करोड से ज्यादा प्रवासी

## दुनिया में सबसे ज्यादा प्रवासी भारतीय, इनकी आबादी १.७५ करोड़, मैक्सिको दूसरे और चीन तीसरे स्थान पर

**भारतीय मूल के प्रवासी स्वदेश धन भेजने में भी सबसे आगे रहे हैं – एजेंसी – संयुक्त राष्ट्र**

दुनिया में सबसे ज्यादा प्रवासी, भारतीय मूल के लोग हैं। इनकी संख्या १.७५ करोड़ है। द इंटरनेशनल आर्गेनाइजेशन फॉर माइग्रेशन (आईओएम) ने अपनी ग्लोबल माइग्रेशन रिपोर्ट २०२० में यह दावा किया है। यह रिपोर्ट २०१८ के आंकड़ों के आधार पर बनाई गई है। इसके मुताबिक दूसरे स्थान पर मैक्सिको (१.१८ करोड़) और तीसरे पर चीन (१.०७ करोड़) है। भारतीय २०१५ में भी सबसे आगे थे। तीन साल में भारतीय प्रवासियों की संख्या में ०.१% बढ़ोतरी हुई है। इन लोगों ने अपने देश को एक साल में ५.५ लाख करोड़ रुपए भेजे हैं। यह २०१५ की तुलना में ७० हजार करोड़ रुपए ज्यादा हैं। जबकि दुनियाभर के प्रवासियों ने अपने देशों में ४९ लाख करोड़ रुपए भेजे। दुनिया में प्रवासियों की संख्या करीब २७ करोड़ है। प्रवासियों का सबसे बड़ा देश अमेरिका है। यहां करीब ५.१ करोड़ प्रवासी हैं। यह आंकड़ा दुनिया की आबादी का ३.५% है। इसका मतलब यह है कि अमूमन किसी भी देश में ९६.५ % लोग स्थानीय या मूल निवासी ही हैं। प्रवासियों में से आधे से अधिक यानी १४.१ करोड़ यूरोप और उत्तर अमेरिका महाद्वीप में रहते हैं। प्रवासियों में ५२% पुरुष हैं। करीब दो तिहाई यानी १६.४ करोड़ प्रवासियों को रोजगार की तलाश है।

भारत के करीब २.२% लाख लोगों को अमेरिका में वैध स्थायी निवास की अनुमति का इंतजार है। ये लोग परिवार प्रायोजित ग्रीन कार्ड पाने के लिए कतार में हैं। इस सूची में मैक्सिको के सबसे ज्यादा १५ लाख लोग हैं। इसके बाद भारत और फिर १.८० लाख के साथ चीन का नंबर है। ये वे लोग हैं, जिनके परिवार का कोई सदस्य अमेरिकी नागरिक है। अब ये भी वहां बसना चाहते हैं।

**तीन मुख्य देश, जहा प्रवासी सबसे ज्यादा रेमिटन्स भेज रहे है ।**

| देश | २०१५ | २०१८ |
|---|---|---|
| भारत | ४.९ | ५.५ |
| चीन | ४.५ | ४.८ |
| मैक्सिको | १.८ | २.५ |

*सभी आकडे लाख करोड रुपये में

# कृषी माल प्रक्रिया उद्योग



**-संजय सोनवणी**

भारतात निर्जलीकृत शेतमालाच्या प्रकल्पांची चर्चा सुरु झाली ती जागतिकीकरण आल्यावर. मलाही यात रस असल्याने मी नेदरलँड, इंग्लंड व अमेरिकेतील लहाण ते अवाढव्य प्रकल्पांना भेटी दिल्या. यात विदेशी तंत्रज्ञान जसेच्या तसे भारतात वापरता येणार नाही हे माझ्या लक्षात आले. भारतातील कांदा निर्जलीकरणाचे प्रकल्प का यशस्वी झाले नाहीत तेही लक्षात आले. पण मुलभूत तंत्रज्ञान मात्र समानच राहनार होते पण बाकीचे अनेक पॅरामीटर्स बदलावे लागणार होते. मी भारतात परत येऊन स्वतंत्रपणे एक पायलट प्लांट टाकला आणि त्यात जवळपास सहा महिने विविध प्रकारच्या भाज्या, फळे ते मासे यावर प्रयोग केले. ते अत्यंत यशस्वी झाले. त्या काळात मला काश्मिरमध्ये हा प्रकल्प नेण्याची कल्पना (माझ्या अनेक मित्रांच्या मते अवदसा) सुचली. यावर तिकडे खर्च केलेले पैसे तर गेले पण प्रकल्प झाला नाही. २००३ साली मी दुसऱ्या अन्य कारणाने एवढ्या प्रचंड अडचणीत आलो की मला माझे होते ते अन्य ४-५ उद्योग बंद करावे लागले. पण निर्जलीकरण हा विषय कधीच मनातून गेला नाही. मी शक्य तेवढा या तंत्रज्ञानाचा प्रचार करतच राहिलो. शेतक-यांना संकटातून कायमचे मुक्ती देणे हे केवळ निर्जलीकरणाचे सोपे तंत्रज्ञान वापरण्यावर अवलंबून आहे असे मला वाटते. जे मला माहित आहे ते दुस-यांना देण्यात मला आनंदच आहे.

भारतामध्ये दरवर्षी ५८००० कोटी मुल्याच्या फळ-पालेभाज्या आणि फळे वाया जातात. हा झाला सरकारी आकडा..प्रत्यक्षात त्याहीपेक्षा कितीतरी पटीने वाया जाण्याचे प्रमाण आहे. याला मुख्यत्वे कारण आहे प्रक्रिया उद्योगांचा आणि शीतगृहांचा अभाव. एकुण उत्पादनापैकी २-३% पेक्षा अधिक शेतमालावर प्रक्रिया होत नाही. प्रक्रिया अनेक पद्धतीने होवू शकतात...पण त्या अत्यंत महागड्या असल्याने (उदा. डीप फ्रीझिंग) अंततः त्याच्या किंमती अवास्तव वाढतात व त्याला हवी तशी बाजारपेठ मिळत नाही.

निर्जलीकरण ही सर्वांच्या परिचयाची, मानवाने हजारो वर्षांपुर्वी शोधलेली प्रक्रिया आहे. आपण रोज कितीतरी निर्जलीकृत पदार्थ आहारात रोज वापरत असतो. धने असोत कि हळद, सुके मासे असोत कि वाटान्यादी कडधान्ये. अर्थात ती उन्हात उघड्यावर वाळवलेली असतात. पण त्यामुळे ती हायजिनिकही नसतात. सुदैवाने भारतात सुर्यप्रकाशाची कमतरता नाही. पण वेळोवेळी होणारे वातारणीय बदल, अवकाळी पावुस इ. कारणांनी केवढे फटके बसतात हे आपण दरवर्षी बघत असतो त्यामुळे वाया जाणारा माल ही राष्ट्रीय आणि व्यक्तिगत संपत्तीचा नाशच असतो. शिवाय साराच शेतमाल उन्हात वाळवता येत नाही.

कृत्रीमरित्या नियंत्रीत तापमानात अत्यंत आरोग्यदायी पद्धतीने शेतमालावर निर्जलीकरणाची प्रक्रिया करता येते हा शोध औद्योगीक क्रांतीनंतर कल्पक संशोधकांनी लावला आणि त्यातुन अवाढव्य पकल्प उभे राहीले. भारतात उन-वाळवणी सोडली तर नवे आर्थिक धोरण येईपर्यंत हे तंत्रदक्यान आले नव्हते. अजुनही ते अत्यंत मर्यादित आहे. याचे खरे कारण म्हणजे त्यांनी युरोपियन तंत्रदक्यान जसेच्या तसे येथे वापरण्याचा प्रयत्न केला. भारतातील वातावरणीय परिस्थीती, ठिकठिकाणचे बदलते वायुमान, हवेतील आद्रता, तापमान याचा विचारच केला नव्हतात त्यामुळे अनेक कारखाने बंद पडले. काहींचे हेतुही प्रामाणिक नव्हते. त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे मुळात अत्यंत साधे-सोपे असणारे हे तंत्रदक्यान पुरस्कृत केले गेले नाही...सरकार यात मागे पडले. शेतमालाचा विनाश तसाच चालु राहिला. आणि आजही आपण बदललो नाही तर तो तसाच सुरू राहील.

निर्जलीकरणामुळे शेतमालाचे आयुष्य तर वाढतेच (किमान २ वर्ष) पण वजनही कमी झाल्याने वाहतुकीचा खर्च कमी होतो. चवीतही वाढ होत असल्याने ती जनसामांन्यात लवकर लोकप्रिय होवू शकतात. किंचीत खराब झालेला, बाजारात नेता येवु शकत नसलेला ही माल प्रक्रियाक्रुत करता येवु शकतो.

आपण खालील पदार्थ निर्जलीकृत करु शकतो:

कोथिंबीर ते सर्व पालेभाज्या, फळभाज्या, टोम्यटो ते सर्व प्रकारची फळे, मांस- मासे इ.

प्रत्येक पदार्थासाठीच्या प्रक्रियेत थोडाफार फरक असतो जे मी ते पुढील लेखत स्पष्ट करेलच. या प्राथमिक लेखाचा उद्धेश आहे तो असा:

१. शक्य तेवढ्या शेतमालावर गावोगावी छोट्या निर्जलीकरण प्रकल्पातुन प्रक्रिया करणे.

२. स्थानिक रोजगार वाढवणे.

३. एक पातेही/फळही फेकुन द्यावे लागनार नाही याची काळजी घेणे.

४. बाजारभाव आपसुक नियंत्रीत करणे. (बाजारभाव उत्पादन किंमतीपेक्षा कमी असले तर एक किलोही ताजा माल बाजारात न पाठवणे.)

५. प्रक्रियाकृत मालाचे विपणन करण्याची यंत्रणा उभारणे.

६. शेतमालाची एकुणातील मुल्यवृद्धी साधणे.

यातुन शेतकऱ्यांना मोठेच आर्थिक बळ मिळेल. गावोगावी (वा ४-५ गावे मिळुन एक) असे प्रकल्प उभे झाले तर ,मोठी शेतकी क्रांती घडुन येवु शकते. हे तंत्रज्ञान खरोखर खुप सोपे आहे. मोठ्या भांडवलाची गरज नाही. कुशल तंत्रज्ञांनाची आवश्यकता नाही. ट्रेनिंग/तंत्रज्ञान द्यायला मी तयार आहे. (कसलीही अपेक्षा नाही). हा प्लांट आपल्या नजीकच्या वर्कशॉपमध्ये बांधुन घेता येईल...असे प्लांट बनवणाऱ्या कंपन्याही आहेत...पण त्यांचे दर अवस्तव असतात.

आपल्याला जर खरी शेतकी क्रांती घडवायची असेल, शेतकऱ्यांना दैन्यावस्थेतुन बाहेर काढायचे असेल तर हा एक सर्वोत्तम मार्ग आहे. एक लक्षत घ्या निर्जलीकृत शेतमाल जगभर मागणीत आहे. असंख्य पदार्थ आपण रोज आहारात वापरत आलेलोच आहोत. निर्जलीकरण केल्याने मुळ चवीत कसलाही फरक पडत नसून उलट त्यात वाढच झालेली असते. नियंत्रीत वातावरणात उत्पादन केल्याने ताज्या मालापेक्षा हे निर्जलीकृत पदार्थ कैक पटीने आरोग्यदायी असतात. निर्जलीकरण म्हणजे अन्य काही नसून फळ-पालेभाज्यांतील अतिरिक्त जल आपण नियंत्रीत तापमानात काढुन घेत त्याचे आयुष्य वाढवत असतो. त्यात कसलेली अन्य द्रव्य मिसळावे लागत नाही. त्यामुळे ते जसेच्या तसे शुद्ध रहात असते. दिवसा १ टन ते १० टन कच्च्या मालावर प्रक्रिया करता येईल असे लघु प्रकल्प अधिक यशदायी ठरतील.

*** संजय सोनवणी हे प्रसिद्ध लेखक, सामाजिक कायकर्ते, विचारवंत, उद्योजक आहेत.**

******

# स्टार्ट अप संस्कृती ये रे ये रे पैसा

– डॉ.संदीप कडवे




१९९० च्या दशकात IPO (पब्लिक इश्यु) शेकड्याने भांडवली बाजारात आले व कोट्यावधी रुपये ईक्विटी (समभाग) च्या रुपाने उभारून गेले. कालांतराने त्यातील खुप कंपन्या बंद पडल्या, त्यांचे शेअर्स स्टॉक एक्सचेंज वरून डी.-लीस्ट झाले व लाखो सर्वसामान्य गुंतवणुकदारांचे प्रचंड नुकसान झाले. त्यानंतर अनेक शहरात चालू झालेले स्टॉक एक्सचेंजेस देखील बंद झाले. त्यानंतर ऑनलाईन ट्रेडींगला सुरुवात झाले. SEBI या संस्थेची शेअर मार्केट वर निगराणी करण्यासाठी स्थापना झाली. Bombay Stock Exchange (BSE) या सर्वात जुन्या शेअर मार्केटचे आधुनिकीकरण झाले, ऑनलाईन ट्रेडींग एक्सचेंज म्हणून National Stock Exchange (NSE) ची स्थापना झाली. छोट्या कपंन्यांसाठी सुरु केलेले OTCEI (Over The Counter Exchange of India) बंद पडले. खुप वर्षानंतर BSE मध्येच SME Segment चालु झाले. BSE SENSEX ४,००० वरुन वाढुन आता ४०,००० पार झाला आहे. अर्थातच शेअर मार्केटमध्ये ज्यांनी चांगल्या कंपन्यांमध्ये गुंतवणुक केली त्यांना दहापट मूल्यवृद्धी मिळाली असे समजण्यास हरकत नाही.

२००० च्या सुमारास Dotcom चे युग आले. IT व Technology वर आधारीत अनेक उद्योग निर्माण झाले. याची सुरवात Y2K पासुन झाली. पण अमेरिकेतील भारतीय उद्योजकांनी व इतर उद्योजकांनी अनेक नवीन कल्पना Internet चा वापर करून यशस्वी करून दाखवल्या व त्यांनी मोठ्या गुंतवणुकदारांकडून अनेक मिलीअन किंवा बिलीअन डॉलर्स उभे केले. अशा यशस्वी, कल्पक व नवश्रीमंत उद्योजकांनी मग The Indus Entrepreneur (T.I.E) या संस्थेची १९९२ मध्येच स्थापना केली होती. ह्याचा जगभर विस्तार झाला. २००३ मध्ये दुबईला ३३ वी शाखा सुरु झाली व २०१८ मध्ये मध्यप्रदेशांत ६३ वी शाखा TIE MP या नावाने सुरु झाली. उद्योजकतेला प्रोत्साहन देणे असा याचा उद्देश आहे.

२०१४ नंतर मोदी सरकारने Start up India, Make in India वगैरेची घोषणा केली व स्टार्टअपचे महत्व वाढले. IPO, Dot com, SME/MSME व Start up असा हा गेल्या ३० वर्षातील प्रवास थोडक्यात सांगितला.

**सर्वसामान्य बिझनेस पेक्षा स्टार्टअप वगेळे कसे ?**

म्हणजे किराणा दुकान चाल केले तर त्याला स्टार्टअप म्हणता येत नाही. पण shop kirana या नावाने किरणाचाच बिझनेस नवीन बिझनेस मॉडेल वापरून चालू केला तर ते स्टार्टरुप होते व त्याला प्रचंड फंडींग देखील मिळते. २०१५ मध्ये इंदौर मध्ये सुरु केलेल्या या स्टार्टअपची उलाढाल सुरवातीला केवळ दोन करोड होती. व २०१९ मध्ये शॉप किराणाची उलाढाल ४५० करोड रुपये झाली म्हणजे २२५ पट वाढ झाली. दिपक धनोतीया, तनुतेजस सारस्वत व सुमित घोरावत यांनी सुरु केलेल्या या स्टार्टअपला अमेरीकेचे बेटर कॅपिटल, जपानचा इनक्युबेट फंड व नोकरी डॉट कॉम ने १४ करोडचे फंडींग देखिल दिले आहे. Flipkart या संपूर्णपणे Online portal चे valunation तर ६००० करोड रुपया पलीकडे गेले व त्यातून आपला शेअर विकुन हजारो करोड घेऊन बिनी बन्सल व बन्सल यांनी Exit देखील केले. वरील उदाहरणात Shop kirana ला Baby corn असे नाव दिले कारण त्याचा innovative business model मुळे व प्रचंड मार्केट मुळे त्याचा खुप विस्तार होऊ शकतो व अर्थातच त्याचे equity Valuation एक बिलीअन डॉलर्स च्या पार जाऊ शकते. Flipkart चे Valuation अगोदरच एक बिलीअन डॉलर्स पार केले असलयाने ते भारतातील सहा Unicorn पैकी एक Unicorn आहे.

स्टार्टअप हे innovative, scalable व sustainable असावे अशी अपेक्षा आहे. ते कुठल्याही क्षेत्रात असु शकते. सध्या Artificial Intelligence (AI) इंटरनेट ऑफ थिंग्ज (IOT),MR/VR (मिक्स्ड रिॲलिटी, वर्युअल रिॲलीटी), Deep Tech, Block Chain डाटा ॲमॅलिटीक्स, Agri Tech, fin Tech, या क्षेत्रातील स्टार्टअपस् वेगाने विकसित होत आहेत. Healthcare, auto Education, Social sector या क्षेत्रांवर या सर्वांचा खुप प्रभाव पडणार आहे.

तुम्हाला या स्टार्टअप क्षेत्रात यशस्वी उद्योजक व्हायचे असेल तर लवकरात लवकर हे नक्की काय आहे, ते समजुन घ्यावे लागेल. स्टार्टअप हे आसपासच्या समस्यांवर उपाय देते. त्यामुळे सर्वप्रथम डोळे, कान उघडे ठेवून आसपास समस्या काय आहे ते प्रथम समजुन घ्यावे लागतील.

एखाद्या समस्येवर टेक्नॉलॉजीचा अथवा कल्पकतेचा वापर करून काही उपाय शोधता येत असेल व त्याचे बिझनेस मॉडेल तयार करता येत असेल तर झाले स्टार्ट अप तयार. सुरुवातीला स्वत:च्या खिशातून फंडींग केले की त्याला Boot Straping म्हणतात. नंतर Angle Investment व Venture Capital फंडींग करतात. Sector Agnostic Funds असतात, Social Impact funds असतात. CSR (Corporate Social Responsibility) fund देखिल असतात. गेल्यावर्षी ५०,००० करोड रुपयांपेक्षा जास्त फंडींग CSR द्वारे झाले आहे.

या प्रवासात तुम्हाला मार्गदर्शक म्हणून मेंटर (Mentor) ची गरज भासते. त्याची निवड मात्र योग्य करावी. छान टिम तयार करावी. Proof of Concept तयार करावा व मगच इन्व्हेस्टरकडे जावे. शंभर स्टार्टअपस् मधुन २ - ३ स्टार्टअपस् ना फंडींग मिळते. तेव्हा पूर्ण तयारी निशी जावे हे उत्तम.

तुम्हाला तुमच्या आर्थिक भरभराटीसाठी व स्टार्टअपच्या प्रवासासाठी विश्व पांथस्थ तर्फे शुभेच्छा!

******

Vishwa Panthastha: RNI CR No. MAHBIL/2018/69261


# Spintek Middle East FZE

## Products

### SPINDLE DIVISION : -

**SPINDLES FOR VARIOUS APPLICATIONS**



- ★ ALUMINIUM INDUSTRY SPINDLES
- ★ WOOD INDUSTRY SPINDLES
- ★ METAL INDUSTRY SPINDLES
- ★ OPTICAL GLASS SPINDLES

SPINDLE REPAIR AND REBUILD SERVICES FOR ALL KIND OF SPINDLES

### MACHINE TOOL DIVISION :-



- ★ CNC WIRE EDM
- ★ CNC EDM
- ★ CNC - VERTICAL MACHINING CENTERS
- ★ CNC - LATHE MACHINE

### MEASURING INSTRUMENTS DIVISION:-



- ★ SCALES & DROS FOR CONVENTIONAL MILLING AND LATHE MACHINES
- ★ DIGITAL HEIGHT GAUGES
- ★ CO-ORDINATE MEASURING MACHINES
- ★ 3D LASER SCANNERS AND MEASUEMENT
- ★ VISION MEASURING MACHINES

Address : Industrial Area 11 shed no 2 Sharjah UAE

Mob. : +971 5580 95074

Email : sales@spintekgulf.com Web : www.spintekgulf.com